## 2. इतरांकडून जिवाला धोका आहे का याचे मूल्यमापन

स्त्रीने आता तिच्याभोवती असलेल्या वातावरणात राहणे प्रचंड धोक्याचे आहे हे दाखवणारा आलेखस्तंभ:

१. जीव वाचविण्यासाठी घर सोडून जाण्याचा प्रसंग तुमच्यावर आला आहे का?

होय/ नाही

२. तुम्हाला जिवे मारून टाकण्याचा प्रयत्न घरच्या कोणी केला आहे का?

होय/ नाही

३. असा प्रयत्न एकापेक्षा अधिक झाला आहे का?

होय/नाही

४. मारहाण होत असताना तुम्ही आरडओरड करून घरात मदत मागत असतानाही घरातील लोक तुमच्याकडे दुर्लक्ष करतात का?

होय/ नाही

५. तुम्हाला मारून टाकीन अशी धमकी गेल्या काही दिवसांमध्ये देण्यात आली आहे का?

होय/ नाही

एकूण गुण:

या तक्त्यातील एकाजरी प्रश्नाचे उत्तर ‘होय’ असेल तर धोक्याची पातळी ‘तीव्र’ मानावी. जितक्या जास्त प्रश्नांना ‘होय’ म्हणून उत्तर येईल तितका जिवाला जास्त धोका आहे असे समजावे. ही गंभीर बाब तिच्या विश्वासातल्या व्यक्तीला सांगावी. आधारगृहात राहायला जाण्याबाबत सल्ला द्यावा. ‘जीवाला धोका आहे.’ असा अर्ज लिहून घ्यावा.

*(संदर्भ – ‘चक्रभेद’ – लेखन – मनीषा गुप्ते, अर्चना मोरे – मासूम प्रकाशन – वर्ष १० डिसेंबर २०१०)*